# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक : 19.03.2024** **वार-मंगळवार**

---

1.निवडणूक रोख्यांसंबंधीची सर्व माहिती ३ दिवसात जाहीर करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे स्टेट बँकेला निर्देश

2.मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदावरुन इक्बाल सिंग चहल यांना तत्काळ हटवण्याचे केंद्रीय निवडणूक आयोगाचे आदेश

3.अस्वस्थ शेजार हे भारतापुढचं मोठं आव्हान असल्याचं सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांचं मत

आणि

4.सिंधुदुर्गच्या चिपी विमानतळावरून बंगळुरूपर्यंत विमानसेवेला सुरुवात

**<u>निवडणूक रोखे</u>**

निवडणूक रोख्यांसंबंधीची सर्व माहिती येत्या २१ तारखेपर्यंत जाहीर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं काल स्टेट बँकेला दिले. रोखे खरेदी करणारा आणि हे रोखे वटवणारा राजकीय पक्ष यांची माहिती उघड होईल असा रोख्यांचा क्रमांक जाहीर करण्याचे आदेश न्यायालयानं दिले आहेत.

**<u>आयुक्त बदल्या</u>**

लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदावरुन इक्बाल सिंग चहल यांना तत्काळ हटवण्याचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगानं दिले आहेत. याशिवाय स्वतःच्या मूळ जिल्ह्यात किंवा ३ वर्षांपेक्षा अधिक काळासाठी एकाच ठिकाणी कार्यरत असलेले महापालिका आयुक्त, अतिरीक्त महापालिका आयुक्त, महापालिकेचे उपायुक्त यांचीही बदली करण्याचे आदेश निवडणूक आयोगानं दिले आहे. या सर्व बदल्यांची माहिती आज संध्याकाळी ५ वाजेपर्यंत कळवण्याच्या सूचना केंद्रीय निवडणूक आयोगाचे सचिव एस. के. दास यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात दिल्या आहेत. यासंदर्भात निवडणूक आयोगानं २२ फेब्रुवारी रोजी पत्र पाठवूनही संबंधितांच्या बदल्या केल्या नाही, त्याबद्दल निवडणूक आयोगानं स्पष्ट शब्दात नाराजी व्यक्त केली आहे.

**<u>चोक्कलिंगम</u>**

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी काल मुंबईत मंत्रालयात नोंदणीकृत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींबरोबर बैठक घेतली. १८व्या लोकसभा निवडणुकीसाठी राज्यातील मतदानाचं वेळापत्रक, निवडणुकीसाठी विविध पातळ्यांवरची सज्जता यासह निवडणूक प्रक्रिया, अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया, खर्च या विषयीचे नियम आणि तरतुदींविषयी सविस्तर माहिती त्यांनी राजकीय प्रतिनिधींना दिली. राजकीय पक्षांनी नियमांचं काटेकोर पालन करावं, असं आवाहन त्यांनी केलं. तसंच निवडणूक यंत्रणेकडून आवश्यक सर्व सहकार्य दिलं जाईल असं आश्वासनही  चोक्कलिंगम यांनी दिलं.

**आचारसंहिता**

रत्नागिरीचे जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांनीही काल राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित केली होती. आचारसंहितेचं काटेकोर पालन करण्याचं आवाहन त्यांनी केलं. राजकीय पक्षांनी बूथनिहाय प्रतिनिधी नेमावेत, असं त्यांनी सांगितलं.

**मतदारयादी**

कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी काल माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. मतदार यादीत नाव असल्यास 11 प्रकारच्या ओळखपत्रापैकी कोणत्याही एका ओळखपत्राद्वारे मतदान करता येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**निवडणुका**

सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी किशोर तावडे यांनीही काल माध्यमाशी संवाद साधला. मतदानांची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हाभरात विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**आचारसंहिता**

नंदुरबारच्या जिल्हाधिकारी मनिषा खत्री यांनी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना आचारसहिंतेचं काटेकोर पालन करण्याच्या सुचना दिल्या आहेत. धुळ्याच्या सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सीमा अहिरे आणि अपर तहसीलदार वैशाली हिंगे यांनी काल पत्रकार परिषद घेऊन निवडणुकीच्या अनुषंगानं करण्यात आलेल्या उपाययोजनांबाबत माहिती दिली.

**मुख्यमंत्री-बावनकुळे**

महायुतीचं जागावाटप सन्मानजनक पद्धतीनं आणि समन्वयानं होईल; आणि लवकरच ते जाहीर होईल असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत सांगितलं. राज्यात महायुती ४५पेक्षा अधिक जागा जिंकेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीच्या रविवारी मुंबईत झालेल्या सभेत उपस्थित नेत्यांमध्ये आत्मविश्वासाचा अभाव दिसत होता, अशी टीका त्यांनी केली. सर्वच घटकांसाठी सरकारनं वेगवान निर्णय घेत गेल्या दोन वर्षांत राज्याची प्रगती साधली आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

महायुतीच्या बैठका सध्या सुरू असून लवकरच सर्व जागा जाहीर होतील, अशी माहिती भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल नागपुरात दिली. अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांनी भाजपमध्ये प्रवेश केला नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.

**शिवसेना ठाकरे**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कुटुंब संवाद दौऱ्यात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी हिंगोली जिल्ह्यातील वसमत इथं काल भेट देऊन सभा घेतली. शिवसेनेचा विश्वासघात करणाऱ्यांना आगामी लोकसभा निवडणुकीत धडा शिकवा; पक्ष आणि चिन्ह चोरणाऱ्या गद्दार पक्षाला निवडून देऊ नका असं आवाहन त्यांनी जनतेला केलं.

**एएफएमसी**

पुण्यातील एएफएमसी म्हणजेच सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालायाला सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांच्या हस्ते काल सन्मानपत्र प्रदान करण्यात आलं. 1 जुलै 2022 ते 30 जून 2023 या कालावधीत महाविद्यालयानं केलेल्या अतुलनीय कामगिरीसाठी हे सन्मानपत्र प्रदान करण्यात आलं. एएफएमसीचे संचालक आणि कमांडंट लेफ्टनंट जनरल नरेंद्र कोतवाल आणि सुभेदार मेजर आर के सिंग यांनी जनरल अनिल चौहान यांच्या हस्ते हे सन्मानपत्र स्वीकारलं. गेल्या वर्षी १ डिसेंबर रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते AFMCला मानाचा ध्वज प्रदान करण्यात आला होता.

**सरसेनाध्यक्ष**

सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांनी काल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित एका परिसंवादात सहभाग घेतला. चीनचा उदय आणि त्याचे जगावरील परिणाम; या विषयावरचा हा परिसंवाद, विद्यापीठाच्या सामरिक शास्त्र विभागानं आयोजित केला होता. अस्वस्थ शेजार हे भारतापुढचं मोठं आव्हान आहे; यामुळे देशाच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो, असं मत जनरल अनिल चौहान यांनी यावेळी व्यक्त केलं. चीनच्या भू-राजकीय उदयाबरोबर चीनशी असलेला सीमावाद अधिकच तीव्र होणार आहे; याला तोंड देण्यासाठी भारतीय सेनादलं अधिक प्रबळ होणं आवश्यक आहे, असं ते म्हणाले. जागतिक घडामोडींचे अभ्यासक, तज्ज्ञ, तसंच सामरिक क्षेत्रातील संस्थानीही चीनवर लक्ष्य केंद्रित करणं आवश्यक आहे, असं मत जनरल चौहान यांनी व्यक्त केलं.

**दीदीपुरस्कार**

गानसम्राज्ञी भारतरत्न लता मंगेशकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त मंगेशकर कुटुंबियांच्या वतीने दिला जाणारा 'दीदी पुरस्कार'  यंदा प्रसिद्ध गायिका विभावरी आपटे-जोशी यांना प्रदान केला जाणार आहे. उद्या म्हणजे २० मार्चला पुण्यात हा पुरस्कार प्रदान केला जाईल अशी माहिती संयोजन समितीच्या सदस्य मनीषा निश्चल यांनी काल पुण्यात दिली. हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर आकाशवाणीशी संवाद साधताना विभावरी आपटे-जोशी म्हणाल्या ..

**चिपी विमान सेवा**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या चिपी विमानतळावरून बंगळुरू पर्यंतच्या विमानसेवेला कालपासून सुरुवात झाली. चिपी हैद्राबाद सेवेला आजपासून सुरूवात होणार आहे. बेंगळुरूसाठी सोमवार, शुक्रवार आणि शनिवारी तर हैद्राबादसाठी मंगळवार आणि रविवारी चिपी विमानतळावरून उड्डाण होईल. यापूर्वी फक्त मुंबईसाठी चिपीवरुन विमानसेवा सुरु होती पण आता बेंगळुरू आणि हैद्राबाद ही शहरं विमानसेवेने जोडली गेल्यानं सिंधुदुर्गवासीयांची तर सोय होईलच त्याचबरोबर इथल्या पर्यटनालाही चालना मिळेल.

**अपघात**

पुणे-बंगळूरू राष्ट्रीय महामार्गावर वाठार फाट्याजवळ रविवारी झालेल्या अपघातात  4 जणांचा मृत्यू झाला तर 8 जण गंभीर जखमी झाले. कोल्हापूरहून भरधाव वेगाने जाणाऱ्या मालवाहतूक ट्रकने रस्त्याकडेला थांबलेल्या सर्व मजुरांना क्षणार्धात उडवलं आणि टेम्पो जवळपास १०० फूट लांब फरफटत गेला. अपघातानंतर काही काळ महामार्गावरील वाहतूकही ठप्प झाली होती.

**हॉकी-**

१४व्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत हॉकी मिझोराम संघाने काल मेजर ध्यानचंद मैदान गाजवलं. हॉकी मिझोरामने बलाढ्य हॉकी पंजाबचा 4-2 असा धक्कादायक पराभव करत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. उपांत्यपूर्व फेरी गाठणारा मिझोराम हा सातवा संघ ठरला. दरम्यान आसाम हॉकीने पॉडिचेरी संघाचा पराभव केला तर गोवन्स हॉकी आणि हॉकी चंडिगड यांच्यातील सामना 2-2 असा बरोबरीत सुटला.

**हवामान**

येत्या २४ तासात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार..